# कालवडींचे संगोपन व व्यवस्थापन

**प्रा. निखिल सोनोने**
सहाय्यक प्राध्यापक (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)
कृषी महाविद्यालय, गेवराई तांडा, औरंगाबाद

**प्रा. वर्षा भोपळे**
सहाय्यक प्राध्यापिका (कृषीविद्या विभाग)
एम. जी. एम. नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद

दुग्ध व्यवसायातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कालवडींचे संगोपन व व्यवस्थापन होय. कारण कालवड ही भविष्यातील दुधाळू गाय असते, म्हणून कालवडीचे संगोपन व व्यवस्थापन दुग्ध व्यवसायाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे मानले जाते. वेतन काळात भरपूर दूध देण्यासाठी, व्याल्यानंतर योग्य कालावधीत गाभण राहण्यासाठी, भाकडकाळ (६० ते ९० दिवस) कमी राहण्यासाठी तसेच पहिले वेत कमी वयात मिळवण्यासाठी कालवडीची योग्य संगोपन व व्यवस्थापन महत्त्वाचे असते.

### कालवडींचे संगोपन प्रामुख्याने दोन पद्धतीने केले जाते त्या पद्धती खालीलप्रमाणे:

**१) अंतर्गत / बंदिस्त पद्धत:**

या पद्धतीत मोकळ्या जागेच्या चारीही बाजूने कुंपण करून कालवडींना सावलीसाठी शेड बांधलेले असते व त्या ठिकाणी त्यांची चाऱ्याची व पाण्याची सोय केली जाते. खुराक, खनिज, क्षार इत्यादींचाही खाद्यातुन पुरवठा केला जातो.

**२) बाह्य पद्धत / चरावु पद्धत:**

या पद्धतीमध्ये कालवडींना चरावू कुरणांमध्ये चरावयास सोडले जाते. यामध्ये कुरणांचे वेगवेगळे भाग पाडले जातात. कालवड एक भाग चरल्यानंतर तिला दुसऱ्या भागात चरावयास सोडले जाते. अशा पद्धतीने चक्रीय पद्धतीत चरावु कुरणांचा वापर केला जातो. तसेच खुराक, खनिज, क्षार व आवश्यक त्या जीवनसत्वांचा खाद्यातुन पुरवठा केला जातो.

### कालवडीचे व्यवस्थापन:

**आहार नियोजन:**

कालवडीच्या शरीरपोषणासाठी सकस आहार आवश्यक असतो. कालवाडीच्या रोजच्या आहारामध्ये आवश्यक त्या प्रमाणात हिरवा चारा, सुका चारा, खुराक, उच्च प्रथिनांची खनिजे व जीवनसत्वे असणाऱ्या खाद्याचा पुरवठा करावा त्याचबरोबर स्वच्छ व ताज्या पिण्याच्या पाण्याचाही समावेश करावा. साधारणपणे दोन ते चार महिन्यांच्या वयापर्यंतच्या कालवडींना वैरणासोबत पाव किलो खुराक द्यावी. चार ते नऊ महिन्यापर्यंत एक किलो खुराक द्यावी. नऊ ते एकवीस महिन्याच्या वयापर्यंत एक किलो खुराक द्यावा त्यात १ % क्षार व मीठ असावे. दोन ते नऊ महिन्यांच्या वयापर्यंत वासरांना / कालवडींना पाच किलो वैरण द्यावी. नऊ महिन्यांच्या वर वय असलेल्या वासरांना / कालवडींना १२ ते १५ किलो हिरवी वैरण व ६/८ किलो कोरडी वैरण द्यावी.

कालवडींच्या शरीरवाढीबरोबर त्यांचे प्रजोत्पादित अवयव व कास यांची वाढ होण्यासाठी कालवडीचा आहार हा सकस व चांगल्या प्रतीचा असावा.

**निवारा व्यवस्थापन:**

सहा महिन्यांच्या वरील कालवडींचे स्वतंत्र ठिकाणी निवाऱ्याची सोय करावी. नर व मादी यांचा संभोग टाळता यावा म्हणून नरापासून कालवडींचा निवारा दूर वेगळ्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. कालवडींना शरीराची हालचाल व उठबस करण्यासाठी पुरेशी जागा, खाण्यासाठी टाकलेले खाद्य व्यवस्थित खाता यावे म्हणून आवश्यक तेवढी आकाराची गव्हाण आणि पाणी पिण्यासाठी टाकी/हौद या सर्व बाबींचा विचार करूनच कालवडिंसाठी निवारा व्यवस्थापन करावे.

कालवडींचे स्वास्थ्य सुदृढ राहण्याकरिता त्यांचा शारीरिक व्यायाम होणे गरजेचा आहे. त्यासाठी त्यांना रोज सकाळ-संध्याकाळ अर्धा ते एक तास गोठ्यामध्येच किंवा मोकळ्या जागेमध्ये फिरण्यासाठी सोडावे. त्यासाठी लागणाऱ्या जागेची तजबीज निवारा व्यवस्थापनात करणे गरजेचे आहे.

**शास्त्रीयदृष्ट्या कालवाडीच्या वयानुसार त्यांना गोठ्यामध्ये हालचाल करण्यासाठी खालीलप्रमाणे जागा लागते:**

| कालवडीचे वय | जागा (चौ. फूट) |
|---|---|
| ३ महिन्यापर्यंत | २०-२५ |
| ३-६ महिन्यापर्यंत | २५-३० |
| ६-१२ महिन्यापर्यंत | ३०-४० |
| १२ महिन्यापेक्षा जास्त | ४०-५० |

**गोचीड व परोपजीवी कीटकांपासून संरक्षण:**

कालवडींचे स्वास्थ्य उत्तम राहण्याकरिता त्यांचे गोचीड व परजीवी कीटकांपासून संरक्षण करणे आवश्यक आहे. त्याचे कारण म्हणजे कालवडींच्या शरीरावर असणारे गोचीड त्यांच्या शरीरातील रक्त शोषून त्यांना अशक्त बनवत असतात. त्याचप्रमाणे परोपजीवी कीटकांच्या प्रादुर्भावामुळे कालवडींचे खाण्या-पिण्यात लक्ष लागत नाही. यासाठी पशुवैद्यकांसोबत सल्लामसलत करून आवश्यक ते जंतुनाशक व औषधांचा वापर करून गोठ्यातील गोचीड व अन्य किटकांची संख्या नियंत्रणात ठेवावी.

त्याचबरोबर कालवडींना नियमित खरारा केल्यास व पाणी मुबलक प्रमाणात असेल तर हफ्त्यातून एक वेळेस आंघोळ घातल्यास त्यांच्या शरीरावरील धूळ,

मृत केस, गोचीड व परोपजीवी कीटक इत्यादींपासून आपण त्यांचे संरक्षण करू शकतो.

**रोगप्रतिबंधात्मक लसीकरण:**

विविध रोगांच्या संसर्गापासून संरक्षण करण्याकरता प्रतिबंधात्मक लसीकरण गरजेचे असते. १-२ वर्षा पर्यंतच्या कालवडींना एकटांग्या, लाळ्या-खुरकूत तसेच वयस्कर कालवडींना घटसर्प, बुळकांडी, ब्रुसेलोसिस यासारख्या संसर्गजन्य रोगांच्या लसी वेळोवेळी व वातावरणानुसार अनुभवी व तज्ञ पशुवैद्यकाकडून लावून घ्याव्यात.

**प्रजननाचे वय:**

सर्वसाधारणपणे गावठी (देशी) कालवडी २.५ ते ३ वर्ष या वयात प्रजननास सक्षम होतात. तर संकरित कालवडी १८ ते २२ महिन्यात प्रजननाच्या दृष्टीने सक्षम होतात. कालवडीचा पहिला माज खाली जाऊ देऊन दुसऱ्या माजाच्या वेळी कालवड नैसर्गिक किंवा कृत्रीम पद्धतीने भरून घ्यावी. कालवडीची प्रजनन क्षमता ही कालवडीची जात, तिला दिला जाणारा आहार, वातावरणातील बदल व तिचे दैनंदिन व्यवस्थापन अशा विविध घटकांवर अवलंबून असते.

**वाढीव खाद्याची मात्रा (स्टीमिंग अप):**

गाभण कालवडींना विण्याच्या दीड ते दोन महिन्याअगोदर तिच्या गर्भात असणाऱ्या बाळाची चांगली वाढ व्हावी म्हणून तिला या काळात सकस व पौष्टिक आहार आणि खुराक याची मात्रा अधिक वाढवून दिली जाते यालाच शास्त्रीय भाषेमध्ये “स्टीमिंग अप” असे म्हणतात.

गाभण अवस्थेत कालवडींच्या शरीराची होणारी झीज भरून काढण्यासाठी व तिच्या गर्भात असणाऱ्या बाळाची निरोगी व सुदृढ वाढ होण्यासाठी वाढीव खुराकाची मात्रा १-१.५ किलो एवढी द्यावी. खुराकाची मात्रा जसे-जसे कालवडीचे विण्याचे दिवस जवळ येतील तस-तशी वाढवून २-२.५ किलोपर्यंत न्यावी.

**कालवडींचे अन्य प्रशिक्षण:**

सुरुवातीपासूनच कालवडींना प्रेमाने व मायेने सोडबांध करावी. गाभण कालवडींना दिवसातून किमान एक वेळेस कासेला हात लावून त्यांची कास हळूहळू चोळावी, हप्त्यातून एकदा गायीची कास कोमट पाण्याने धुऊन काढावी. त्यामुळे ज्या वेळेस कालवड दूध देण्यास सुरू करेल त्यावेळेस ती दूध काढतेवेळी शांत उभी राहील, लाथ वगैरे मारणार नाही. कालवड विण्याच्या एक महिन्याअगोदर गाभण कालवडींना दुभत्या गाईंच्या गोठ्यामध्ये बांधण्याची सवय लावावी. अशाप्रकारे जर आपण आपल्या कालवडींची योग्य काळजी घेतली तर निश्चितच त्याचा फायदा आपल्या दुग्धव्यवसायाला होईल.

(संपर्क: +९१ ९९२१५१५१७९)

★ ★ ★

## कृषीपर्व मासिकाचे जाणते लेखक व्हा....

शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असलेल्या कृषीपर्व मराठी मासिकाचे आपणही लेखक होऊ शकता. त्यासाठी कृषीशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, संशोधन, पिक उत्पादन, पिक संरक्षण, पिकांचे नविन वाण, काढणी पश्चात तंत्रज्ञान, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, आधुनिक शेती पद्धती, हरितगृह तंत्रज्ञान, पशु संवर्धन, जलसंवर्धन, वनसंवर्धन, शेती योजना, कृषी आधारित उद्योग व इतर विषयावर कृषीक्षेत्रातील तज्ञांचे लेख व महाराष्ट्रातील प्रगतशील शेतकऱ्यांच्या यशोगाथा इत्यादी info@krushiparvmagazine.com किंवा krushiparvmagazine@gmail.com या मेल आयडी वर प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे. उपयुक्त आणि दर्जेदार साहित्याचे आम्ही स्वागत करतो. लेखांसोबत आवश्यक फोटो पाठवा. नव कृषी शास्त्रज्ञांना त्यांच्या लेखांसाठी आम्ही प्रोत्साहित करतो.

अधिक माहितीसाठी संपर्क करा: + ९१ ९४२३७२१८९४ / +९१ ९१७२२४६२४४